29-05-2025-Dai-03_DH_PAN_20_08_2016-3.qxp 5/28/2025 10:17 PM Page 1

निवडक

न्हावेली : यांनी नेटॲप सीएसआर उपक्रमांतर्ग सौर ऊर्जा योजनेचा शुभारंभ करताना मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत. सोबत सरपंच रोहिदास कानसेकर, गोपाळ सुर्लीकर, शिक्षक व अधिकारी.

नवोन्मेष आणि शिक्षणाने मुलांना सक्षम बनवा : मुख्यमंत्री

■ टीम दैनिक हेराल्ड

डिचोली, दि. २८ : मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी नेटॲप कंपनीच्या सामाजिक सेवा उपक्रम अंतर्गत उपक्रम, शाइन ऑन – एम्ब्रेसिंग सोलर एनर्जी फॉर अवर स्कूल्स उपक्रमांतर्गत गोव्यातील ७ सरकारी शाळांमध्ये सौर ऊर्जा प्रणालींचे उद्घाटन केले. या उपक्रमाचे उद्घाटन न्हावेली साखळी येथील सरकारी शाळेच्या आवारात सौर ऊर्जा बसवण्यात आले. मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी सौरऊर्जा हा प्रकल्प शाश्वतता, नवोन्मेष आणि शिक्षण आपल्या मुलांना सक्षम बनवण्यासाठी आणि आपल्या पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी कसे एकत्र येऊ शकतात याचे एक उदाहरण असल्याच सांगितले.

या प्रकल्पात ७ शाळांमध्ये सौर क्षमता आहे. ६२.५ किलोवॅट, अपेक्षित वार्षिक स्वच्छ ऊर्जा निर्मिती: १.१ लाख युनिट, वीज बिलांवर ७५% पर्यंत बचत, दरवर्षी ९५ मेट्रिक टन कार्बन उत्सर्जन कमी, ३,०००+ विद्यार्थ्यांना थेट फायदा होईल अशी माहिती मुख्यमंत्री डॉ प्रमोद सावंत यांनी दिली. हिरवेगार, कुशल आणि मजबूत गोवा निर्माण करण्याच्या या मोहिमेत भागीदारी केल्याबद्दल त्यांनी छएढझझ आणि भारतकेअर्सचे अभिनंदन केले. एकत्रितपणे, आम्ही आमच्या विद्यार्थ्यांसाठी एक उज्ज्वल भविष्य घडवत आहोत, अशी माहिती मुख्यमंत्री डॉ. सावंत यांनी दिली. या प्रसंगी सरपंच रोहिदास कानसेकर, जिल्हाध्यक्ष गोपाळ सुर्लीकर, शिक्षक विद्यार्थी आणि कंपनीचे अधिकारी उपस्थित होते.

मांद्रेत ३० पासून राज्यस्तरीय कार्यशाळा

■ टीम दैनिक हेराल्ड

पेडणे, दि. २८ : पतंजली महिला योग समिती यांच्या यजमान पदाखाली राज्यस्तरीय तीन दिवसीय कार्यशाळा ३० मे ते १ जून रोजी संध्याकाळी ४.३० ते ६.३० पर्यंत मांद्रे दीनदयाळ ग्रामपंचायत सभागृहात होणार असल्याचे पेडणे तालुका महिला पतंजली समिती अध्यक्ष नीलम पार्सेकर यांनी सांगितले.

या तीन दिवसीय कार्यशाळेत रोगानुसार योग मध्ये जिल्हा प्रभारी गीताजी तांडेल,भक्तीयोग कार्यक्रमात भारत स्वाभिमान राज्य प्रभारी डॉ कमलेश बांदेकर, सह प्रभारी गिरीश परुळेकर तसेच हवन यज्ञसाठी कार्यकर्ते पोपटजी व कल्पेशजी मुळगावकर मार्गदर्शन करणार आहेत.ह्या तिन्ही दिवस उपस्थिती लावून आपले आरोग्य निरोगी ठेवण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे,असे आवाहन पेडणे तालुका अध्यक्ष नीलम पार्सेकर व भारत स्वाभिमान पेडणे तालुका प्रभारी शशिकांत कोरकणकर यांनी केले.

पतंजली योग समिती योगदेव रामदेव बाबा,आचार्य बालकृष्णजी,साध्वी देवजी यांच्या मार्गदर्शनाने कार्य सुरू आहे.संपूर्ण देशात कार्यक्रम होत असून,गोव्यात पेडणे तालुका महिला समितीला आयोजनाची संधी मिळाली असल्याचे पार्सेकर यानी सांगितले.ह्या कार्यशाळेची लाभ घेऊन आरोग्य निरोगी ठेवण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन भारत स्वाभिमान उत्तर गोवा अध्यक्ष पांडुरंग पिंगे यांनी केले.

या कार्यशाळेच्या आयोजनात भारत स्वाभिमान,पतंजली योग समिती,पतंजली किसान सेवा समिती व पतंजली युवा भारत यांचा सहभाग आहे.महिलांनी स्वतःसाठी वेळ द्यावा व उपस्थिती लावावी, असे आवाहन दीपाली नाईक, भाविका वस्त यांनी केले.

या पत्रकार परिषदेत उत्तर गोवा महिला अध्यक्ष वंदना कुडव, जिल्हा पेडणे तालुका महिला पतंजली समिती अध्यक्ष नीलम पार्सेकर, हरमल ग्राम महिला अध्यक्ष दीपाली नाईक, हरमल सचिव भाविका वस्त, भारत स्वाभिमान पेडणे तालुका प्रभारी शशिकांत कोरकणकर, भारत स्वाभिमान उत्तर गोवा अध्यक्ष पांडुरंग पिंगे, मांद्रे सुजय म्हामल, पालये चंद्रकांत तिळवे उपस्थित होते. शेवटी भाविका वस्त यांनी आभार मानले.

पार्से येथील धोकादायक रस्त्याच्या दुरुस्तीचे काम सुरू

■ टीम दैनिक हेराल्ड

पेडणे, दि. २८ : मांद्रे मतदारसंघासाठी खास तुये आयटीआय परिसरात ३० एमएलडी पाणी प्रकल्प उभारण्याची युद्ध पातळीवर काम सुरू आहे. त्या प्रकल्पाकडून जलवाहिनी तुये व्हाया पार्से आगरवाडा चोपडे पर्यंत नेण्यासाठी काही ठिकाणी मागच्या दोन महिन्यापासून जलवाहिनी टाकण्याचे काम युद्ध पातळीवर सुरू होते.

पार्से या ठिकाणी जलवाहिनी टाकण्यात आली होती. त्या परिसराचा रस्ता व्यवस्थित फोडलेला रस्ता बुजवला गेला नाही. त्यामुळे अचानक पडलेल्या पावसामुळे ठीक ठिकाणी खड्डे पडून काही वाहने रुतण्याचाही प्रकार घडला त्याबद्दल नागरिक नाराजी व्यक्त करत होते. सध्या कंत्राटदाराने या रस्त्याच्या दुरुस्तीचं काम हाती घेण्यात आल्यामुळे नागरिक समाधान व्यक्त करतात. त्यासंदर्भात पार्सेचे सरपंच अजय कलंगुटकर यांनी यापूर्वीच प्रतिक्रिया देताना अचानक पडत असलेल्या पावसामुळे रस्त्याचे दुरुस्ती काम करताना अडचणी आल्याचे सांगून हा रस्ता नीटनेटका केला जाईल. असा त्यांनी विश्वास व्यक्त केला.

रस्त्याचे खोदकाम करत असताना जलवाहिनी टाकत असताना जर तो वेळेतच ती जलवाहिनी घातल्यानंतर व्यवस्थित रस्ता बुजवला असता त्याची डागडुजी केली असती तर अडचणी निर्माण झाल्या नसत्या. परंतु अचानक पाऊस पडल्यामुळे या कामावर परिणाम झाल्याचे दिसून येते.

पाटो पणजीत 'छायाचित्रण कला'वर कार्यशाळेला सुरुवात

■ टीम दैनिक हेराल्ड

पणजी, दि. २८ : कला आणि संस्कृती संचालनालयाने १० ते १५ वर्षे वयोगटातील मुलांसाठी आयोजित केलेली पांच दिवसांची छायाचित्रण कला कार्यशाळेचे कला व संस्कृती संचालनालयाचे संचालक श्री सगूण वेळीप यांच्याहस्ते झाले. ही कार्यशाळा बहुउद्देशीय सभागृह, संस्कृती भवन, पाटो येथे २६ ते ३० पर्यंत सकाळी १० ते दुपारी १२ वाजेपर्यंत चालेल. या कार्यशाळेत सुमारे ५० मुलांनी भाग घेतला.

कला आणि संस्कृती संचालक सगूण वेळीप यांनी या कार्यशाळेचा उद्देश म्हणजे मुलांना छायाचित्रणाचे ज्ञान देणे असा आहे असे सांगितले. देवाने दिलेल्या निसर्गात रंगांची अमर्याद विविधता आहे, आपल्याला फक्त त्यांचा शोध घ्यायचा आहे असे ते म्हणाले. या छायाचित्रण कार्यशाळेमुळे मुलांचे करिअर घडविण्यासही फायदा होईल असेही ते म्हणाले. कार्यक्रमात श्री परितोष पै आणि त्यांच्या सहाय्यक श्रीमती रमा पै मुलांना कॅमेरा वापरण्याचे प्रात्यक्षिक मार्गदर्शन करतील.

यावेळी कला आणि संस्कृती संचालनालयाचे उपसंचालक राजू गावकर, सहाय्यक सांस्कृतिक अधिकारी श्रीमती क्रांती च्यारी, परितोष पै आणि श्रीमती रमा पै उपस्थित होत्या. सांस्कृतिक अधिकारी श्रीमती रदिमा जोगले यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

राशोलमध्ये बेकायदेशीर जहाज पार्किंगविरोधात ग्रामपंचायतीची तक्रार

ग्रामपंचायतीने तीव्र आक्षेप नोंदवला | संबंधित अधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल

■ टीम दैनिक हेराल्ड

मडगाव, दि. २८ : इल्हा द राशोल येथील नदीकिनारी बेकायदेशीररित्या उभ्या असलेल्या मासेमारी जहाजांवर आणि त्यांच्याशी संबंधित अनधिकृत कामगार वसाहतीवर राशोल ग्रामपंचायतीने तीव्र आक्षेप नोंदवला आहे. पंचायतीने हा प्रकार कोस्टल रेग्युलेशन झोन (सीआरझेड) नियमांचे गंभीर उल्लंघन असल्याचे नमूद करत, संबंधित अधिकाऱ्यांकडे तक्रार दाखल केली आहे.

ग्रामपंचायत सरपंच जोसेफ वाज यांच्या नेतृत्वाखालील पंचायतीच्या मंडळाने संबंधित सीआरझेड अधिकाऱ्यांना पत्राद्वारे तातडीने कारवाई करण्याची मागणी केली आहे. सरपंच वाज यांनी सांगितले की, चॅपल आणि स्थानिक फुटबॉल मैदानासमोरील नदीकाठावर अनेक ट्रॉलर आणि मासेमारी नौका अनधिकृतपणे पार्क केल्या जात आहेत, ज्यामुळे सार्वजनिक पायाभूत सुविधांना धोका निर्माण झाला आहे.

या बेकायदेशीर पार्किंगमुळे पंचायतीने उभारलेल्या संरक्षक भिंतीचे नुकसान होत आहे. याशिवाय, स्थानिक मच्छीमारांच्या दैनंदिन उपजीविकेला मोठा फटका बसतो आहे, कारण त्यांच्या बोटींना थांबण्यासाठी आता पुरेशी जागा उपलब्ध नाही, असे सरपंच वाज यांनी सांगितले.

पंचायतीने बोटींवर काम करणाऱ्या कामगारांच्या राहण्याच्या व्यवस्थेवरही चिंता व्यक्त केली आहे. सरपंच वाज यांनी स्पष्ट केले की, हे कामगार कोणत्याही अधिकृत परवानगीशिवाय परिसरात वास्तव्य करत असून, त्यांच्याकडे मूलभूत सुविधा नाहीत. विशेषत: काही कामगार बंधाऱ्याच्या आसपास उघड्यावर शौच करत असल्याने आरोग्यधोका निर्माण झाला आहे. अशा अस्वच्छ परिस्थितीत डेंग्यूसारख्या रोगांचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता नाकारता येत नाही, असा इशारा सरपंचांनी दिला. या कामगारांची नियमित आरोग्य तपासणी झाली पाहिजे, अन्यथा स्थानिक समुदायाच्या आरोग्यावर परिणाम होण्याची शक्यता आहे असे ते म्हणाले.

या पार्श्वभूमीवर बेकायदेशीरपणे पार्क करण्यात आलेली जहाजे त्वरित अधिकृत पार्किंग झोनमध्ये हलवावीत, स्थलांतरित कामगारांसाठी योग्य निवास आणि स्वच्छता सुविधा उपलब्ध कराव्यात आणि संभाव्य रोगप्रसार टाळण्यासाठी आरोग्य विभागाच्या सहकार्याने नियमित आरोग्य तपासण्या केल्या जाव्यात अशा मागण्या पंचायतीने संबंधीत विभागांकडे केल्या आहेत. स्थानिक पर्यावरणाचे रक्षण, पायाभूत सुविधांचे जतन आणि ग्रामस्थांच्या आरोग्याच्या दृष्टीने ही बाब अत्यंत गंभीर असल्याचा पुनरुच्चार पंचायत सदस्यांनी केला.

वेळेआधीच सुरू झालेल्या पावसामुळे बीच शॅक्स झाले बंद

■ टीम दैनिक हेराल्ड

कळंगुट, दि. २८ : यंदाचा मान्सून अपेक्षेपेक्षा लवकर आल्याने कळंगुट व बागा येथील बीच शॅक मालकांनी जूनच्या मध्यापर्यंत शॅक सुरू ठेवण्याच्या योजना मागे घेतल्या आहेत. कडक हवामानामुळे निर्माण झालेल्या धोकादायक परिस्थितीमुळे शॅक ओनर्स वेल्फेअर सोसायटीने पर्यटन विभागाकडे शॅकसाठी मागितलेली मुदतवाढ मागे घेतली आहे.

गेल्या काही दिवसांत जोरदार वारे आणि मुसळधार पावसामुळे कळंगुट–वॅंडोलिम किनारपट्टीवरील काही शॅक पडले असून, हवामानाची स्थिती अत्यंत अस्थिर आणि धोकादायक झाली आहे. त्यामुळे कोणतीही दुर्घटना होऊ नये, यासाठी आम्ही पर्यटन विभागाला मंगळवारी पत्र पाठवून शॅक मुदतवाढ रद्द करण्याची मागणी केली आहे, अशी माहिती शॅक ओनर्स वेल्फेअर सोसायटीचे सरचिटणीस जॉन लोबो यांनी दिली.

गेल्या वर्षी पर्यटन हंगामात जूनच्या मध्यापर्यंत शॅक सुरू ठेवण्यास पर्यटन विभागाने परवानगी दिली होती. त्या पार्श्वभूमीवर यंदाही अशीच अपेक्षा होती. मात्र यावर्षी मान्सून लवकर दाखल झाल्यामुळे अनेक शॅकधारकांनी आपापले व्यवसाय ठरलेल्या वेळेपेक्षा आधीच बंद करण्यास सुरुवात केली आहे.

लोबो पुढे म्हणाले की, चक्रीवादळसदृश हवामानामुळे समुद्रकिनाऱ्यावरील झोपड्यांना थेट पाण्याचा फटका बसतो आहे. किनारपट्टीवर मोठ्या प्रमाणात धूप झाल्याचेही निदर्शनास आले आहे. हंगाम संपण्याच्या दोन महिने आधीच जवळपास निम्मे शॅक बंद झाले आहेत.पर्यटन विभागाने याप्रकरणी लवकरच निर्णय घेण्याची शक्यता आहे.

गांधी मार्केटमधील ड्रेनेज तातडीने साफ करा

■ टीम दैनिक हेराल्ड

▶ व्यापाऱ्यांनी धरले नगरपरिषदेला जबाबदार

मडगाव, दि. २८ : गांधी मार्केटमध्ये पावसाळ्याच्या हंगामात पुन्हा एकदा पूरस्थिती निर्माण झाल्याने येथील दुकानदारांचे हाल बेहाल झाले आहेत. मडगाव नगरपरिषद (एमएमसी) प्रशासनाने ड्रेनेज साफसफाईवर योग्य तो दक्षता न घेतल्यामुळे मोठ्या प्रमाणावर पाणी साचले असून, त्यामुळे बाजारपेठेतील व्यापार विस्कळीत झाला आहे.

गांधी मार्केटमधील व्यापारी संघटनेचे अध्यक्ष राजेंद्र आजगावकर यांनी या संदर्भात म्हटले की, आम्ही अनेकदा नगरपरिषदेकडे या समस्येबाबत तक्रार केली, मात्र अद्याप कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. साचलेल्या पाण्यामुळे बाजारात दुर्गंधी निर्माण झाली असून व्यवसायावर मोठा परिणाम होत आहे.

२० मे रोजी झालेल्या मुसळधार पावसामुळे गांधी मार्केटमधील सुमारे २० दुकाने पूर्णपणे पाण्याखाली गेली. या घटनेमुळे व्यापाऱ्यांमध्ये तक्रारी आणि नाराजी वाढली आहे. प्रभावित दुकानदारांपैकी अनिल कालेकर म्हणाले की, आम्ही जवळपास आठ दिवसांपासून या समस्येला सामोरे जात आहोत. अनेक तक्रारी असूनही अधिकाऱ्यांकडून कारवाई होत नाही, ज्यामुळे व्यवसायाचा मोठा धोका निर्माण झाला आहे.

माजी मंत्री बाबू आजगावकर यांनीही मडगाव नगरपरिषद व प्रशासनावर टीका करत, ड्रेनेज साफसफाईत उदासीनता केल्यामुळे हा प्रश्न उध्वस्त झाला आहे. एमएमसीचे अधिकारी आणि अध्यक्ष यांना याबाबत त्वरित जबाबदारी घ्यावी लागेल, असे सांगितले. त्यांनी त्वरित कारवाई न झाल्यास व्यापाऱ्यांकडून आंदोलनाचा इशारा दिला. आठ दिवसांच्या आत या समस्येवर उपाययोजना न केल्यास आम्ही नगरपरिषदेला कर देणे थांबवू आणि बाजार बंद ठेवण्याचा निर्णय घेऊ, असे बाबू आजगावकर यांनी जाहीर केले.

व्यापाऱ्यांनी येणाऱ्या पावसाळ्याला दृष्टिने नगरपरिषदेकडून तातडीने ड्रेनेज प्रणालीची पूर्ण साफसफाई करावी आणि योग्य देखभाल करावी अशी मागणी केली आहे. त्यांनी असेही स्पष्ट केले की, विलंब झाल्यास आर्थिक तोटा आणि सार्वजनिक आरोग्यावर गंभीर परिणाम होण्याची शक्यता आहे.

नावेली ते काकोडा प्लांटपर्यंत कचरा हस्तांतरण प्रक्रिया सुरू

■ टीम दैनिक हेराल्ड

मडगाव, दि. २८ : नावेली मतदारसंघातील दीर्घकाळापासून चालत आलेल्या कचरा समस्या सोडवण्यासाठी गोवा घनकचरा व्यवस्थापन प्राधिकरणाने नावेली येथील साचलेल्या कचऱ्याचा काकोडा येथील कचरा प्रक्रिया प्रकल्पाकडे हस्तांतरण सुरू केले आहे. बुधवारपासून सुरू झालेल्या या उपक्रमाला स्थानिक नेते व ग्रामपंचायतींकडून सकारात्मक प्रतिसाद मिळाला आहे.

या निर्णयामुळे रावणफोंड, दवरली आणि आके भागातील रहिवाशांना मोठा दिलासा मिळाला असून, या परिसरातील पंचायतींनीही याला संपूर्ण पाठिंबा दिला आहे. नावेलीचे आमदार उल्हास तुयेकर यांनी कचरा व्यवस्थापनातील सुधारणा पाहून समाधान व्यक्त केले. त्यांनी सांगितले की, कचरा समस्या अनेक वर्षांपासून अस्तित्वात होती, त्यामागे अपुरी व्यवस्थापन व्यवस्था आणि विश्वासार्ह विल्हेवाट सुविधा नसणे हे मुख्य कारण होते.

नावेली मतदारसंघातील कचरा व्यवस्थापन हा गंभीर प्रश्न होता. अनेक प्रयत्नांनंतरही, गोवा घनकचरा व्यवस्थापन प्राधिकरणाने हस्तक्षेप करून जबाबदारी स्वीकारेपर्यंत ही समस्या सुटली नाही, असे तुयेकर म्हणाले.

वर्षानुवर्षे कचरा संकलन व प्रक्रिया यंत्रणेच्या अभावामुळे स्थानिक पंचायती आणि रहिवाशांवर ताण होता. मतदारसंघातील मटेरियल रिकव्हरी फॅसिलिटी देखील विद्युत खर्च जास्त असल्यामुळे अयशस्वी ठरली. आता घनकचरा व्यवस्थापन प्राधिकरणाच्या देखरेखीत कचरा हस्तांतरण आणि प्रक्रिया सुरु झाल्यामुळे या भागात स्वच्छता आणि पर्यावरण व्यवस्थापनात सुधारणा होण्याची आशा वाढली आहे.

आमदार तुयेकर यांनी याशिवाय सांगितले की, मतदारसंघातील पाच पंचायतींशी कचरा व्यवस्थापनाबाबत चर्चा झाली असून, त्यापैकी रुमडामळ, दवरली आणि आके या तीन पंचायतींनी काकोडा प्लांटला कचरा वाहून नेण्यासाठी सहमती दर्शविली आहे. उर्वरित पंचायतींना सहमती मिळवण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. घनकचरा व्यवस्थापन प्राधिकरणाचा हा हस्तक्षेप नावेलीसाठी कचरा व्यवस्थापनात एक महत्त्वाचा टप्पा ठरेल, ज्यामुळे इतर भागांमध्येही कचरा व्यवस्थापन सुधारण्याच्या दृष्टीने आदर्श निर्माण होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

बेकायदेशीर भंगार अड्ड्यांविरोधात ग्रामस्थांत तीव्र संताप

■ टीम दैनिक हेराल्ड

फोंडा, दि. २८ : किर्लपाल – दाभाळ येथील ग्रामस्थांनी सावरगाळ परिसरात सुरू असलेल्या बेकायदेशीर भंगार कामाबाबत आणि दूधसागर नदीत वाढत चाललेल्या मगरींच्या संख्येबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. नुकत्याच पार पडलेल्या ग्रामसभेत या विषयावर सखोल चर्चा झाली असून, ग्रामस्थांनी संबंधित यंत्रणांकडून तातडीने कारवाई करण्याची मागणी केली आहे.

सावरगाळमधील सोमनाथ हायस्कूलजवळ बेकायदेशीर भंगार काम सुरू असून, त्यामुळे परिसरात प्रदूषण आणि आग लागण्याचा धोका निर्माण झाला आहे. भंगार यार्डात विविध रसायनांची साठवणूक केली जात असून, यामुळे पावसाळ्यात नाल्यांमार्फत प्रदूषण पसरू शकते, असे ग्रामस्थांनी सभेत निदर्शनास आणून दिले. विद्यार्थ्यांचे आरोग्य आणि सुरक्षिततेचा प्रश्नही येथे उपस्थित झाला.

सरपंच दामोदर बांदेकर यांनी सांगितले की, पंचायतीने या भंगार कामास कोणतीही परवानगी (एनओसी) दिलेली नाही. हे काम बंद करण्याचे आदेशही देण्यात आले होते. मात्र, मालकाने न्यायालयातून स्थगिती मिळवली असून सदर प्रकरण सध्या पंचायत उपसंचालकांकडे प्रलंबित आहे. स्थानिकांनी या प्रकरणी प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे तक्रार दाखल करण्याची मागणी केली.

दूधसागर नदीत मगरींच्या संख्येत वाढ झाल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. काही दिवसांपूर्वी दावकोंड परिसरात कपडे धुत असलेल्या एका महिलेला मगरीने जखमी केल्याची घटना घडली. नदीत स्नानासाठी येणाऱ्या बाहेरील पर्यटकांकडून अन्न व कचरा टाकल्याने मगरी नदीकिनाऱ्याला येत असून, त्यामुळे या प्राण्यांचा त्रास वाढला आहे, असे ग्रामस्थांनी सांगितले.

ग्रामसभेत नोंदवण्यात आलेल्या तक्रारींमध्ये नवीन पंचायत घराच्या बांधकामाच्या नियोजनात होत असलेल्या त्रुटींचाही समावेश होता. कंत्राटदाराला नियोजनबद्ध काम करण्याचे निर्देश देण्यात यावेत, अशी ग्रामस्थांची मागणी होती.

गावात सीसीटीव्ही कॅमेरे बसवून सुरक्षाव्यवस्था मजबूत करण्याची आवश्यकता व्यक्त करण्यात आली. तसेच, उघड्यावर कचरा टाकणाऱ्यांना दंडात्मक कारवाई करण्याची मागणीही पुढे आली. वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे ग्रामस्थ त्रस्त असून, यावर कायमस्वरूपी उपाययोजना करण्याचे आवाहन करण्यात आले. कमी व्होल्टेजमुळे घरगुती विद्युत उपकरणांचे नुकसान होत असल्याचेही ग्रामस्थांनी नमूद केले. ग्रामस्थांनी पंचायतीसाठी पूर्णवेळ सचिवांची मागणी केली, कारण सध्या सचिवांकडे दोन ग्रामपंचायतींचा कार्यभार असल्यामुळे नागरिकांना वेळेत सेवा मिळत नाही.

कोडली येथील मुख्य रस्त्यावरील दीर्घकाळ प्रलंबित असलेले गटाराचे काम तातडीने पूर्ण करण्यात यावे, अशी मागणी करण्यात आली. तसेच रस्त्याच्या कडेला झालेले अतिक्रमण हटवण्यासह महामार्गावर भटक्या जनावरांमुळे होणाऱ्या अपघातांचा धोका टाळण्यासाठी त्वरित उपाययोजना करण्याची मागणीही ग्रामस्थांनी केली.

कायमस्वरूपी शिक्षक नियुक्तीची गरज

■ टीम दैनिक हेराल्ड

▶ शाळा व्यवस्थापन समितीच्या बैठकीत बालरथ बस योजना कायम ठेवण्याची मागणी

मडगाव, दि. २८ : मडगाव येथे झालेल्या ७० हून अधिक खाजगी शाळा व्यवस्थापन प्रतिनिधींच्या बैठकीत कायमस्वरूपी शिक्षक नियुक्तीची तातडीने गरज व बालरथ स्कूल बस योजना कायम ठेवण्याचा मुद्दा ठळकपणे मांडण्यात आला. याशिवाय, राज्यातील विद्यमान महाविद्यालयांवर उद्भवणाऱ्या खाजगी विद्यापीठांच्या प्रभावाबाबतही चिंता व्यक्त करण्यात आली.

गोवा मुख्याध्यापक संघटनेच्या नेतृत्वाखाली झालेल्या या बैठकीत प्रमुख बाब म्हणजे शिक्षण क्षेत्रातील सुधारणा आणि संरक्षण. बैठकीनंतर झालेल्या पत्रकार परिषदेत मुख्याध्यापक संघटनेचे अध्यक्ष प्रशांत नाईक यांनी शिक्षकांची नियमित नियुक्ती करण्याची तातडीची आवश्यकता अधोरेखित केली. पाच वर्षांपूर्वीच खाजगी शाळा व्यवस्थापनांना कायमस्वरूपी शिक्षक नियुक्तीची मंजुरी मिळाली होती. मात्र आतापर्यंत का त्याकडे दुर्लक्ष केले जात आहे, याबाबत सरकारने स्पष्टीकरण द्यावे, असे ते म्हणाले. बालरथ स्कूल बस योजनेवर बोलताना नाईक म्हणाले की, ही योजना विशेषतः ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त ठरली आहे. शाळेतील उपस्थितीत वाढ होण्यासाठी आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षित प्रवासासाठी ही योजना कायम ठेवणे आवश्यक आहे. ती बंद झाल्यास शैक्षणिक उपस्थितीवर गंभीर परिणाम होऊ शकतो.

शैक्षणिक व्यवस्थेतील नव्या घडामोडींवर भाष्य करताना नाईक यांनी दक्षिण गोव्यातील पारुल विद्यापीठ आणि उत्तर गोव्यात येणाऱ्या एमआयटी विद्यापीठाबाबत काळजी व्यक्त केली. जर हे विद्यापीठ अद्वितीय अभ्यासक्रम राबवत असतील तर त्याचा फायदा होईल, परंतु विद्यमान राज्य महाविद्यालयांमध्ये आधीच शिकवले जाणारे अभ्यासक्रम सुरू केल्यास त्या महाविद्यालयांच्या अस्तित्वाला धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे नव्या विद्यापीठांच्या स्थापनेसाठी गंभीर मूल्यांकन करणे आवश्यक आहे, असे ते म्हणाले.

याशिवाय, पूर्व–प्राथमिक शाळा सुरू करण्यास परवानगी देण्याच्या मागणीवरही बैठक झाली. नाईक म्हणाले, ज्या भागात पूर्व–प्राथमिक शिक्षणाची सोय नाही, तिथे विद्यार्थी दूर–दूर प्रवास करावा लागत आहे. खाजगी पूर्व–प्राथमिक शाळांना परवानगी दिल्यास शिक्षणाचा दर्जा व प्रवेश दोन्ही सुधारेल.

सदस्य पांडुरंग नाडकर्णी यांनी दीर्घकालीन कंत्राटी शिक्षकांची दुर्दशा उघडकीस आणली. कंत्राटी शिक्षकांनी १०–१५ वर्षे सेवा दिली असून त्यांचे वय आता ४० वर्षांपेक्षा जास्त झाले आहे. मात्र, त्यांना सरकारी नोकरी किंवा निवृत्ती लाभ मिळत नाहीत, त्यामुळे त्यांच्याशी अन्याय होत आहे, असे ते म्हणाले. शाळा व्यवस्थापनांनी सर्व मागण्यांवर सरकारकडे पाठपुरावा करण्याचा ठाम निर्णय घेतला आहे.